# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर- ३१९४/२०२१

अपिलार्थी, श्री.प्रकाश मोहनदास केसवानी
बैरक नं.१९१७, रूम नं.२०,
शनि मंदिरच्या मागे, ओ.टी.सेक्शन
उल्हासनगनर, जि.ठाणे ४२१ ००५.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता,
नगररचना विभाग,उल्हासनगर महानगरपालिका,
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड,
उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा नगररचाकार,
नगररचना विभाग,उल्हासनगर महानगरपालिका,
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड,
उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.

द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ०८.०४.२०२४

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १७.०९.२०२१ | ०८.१०.२०२१ | ०३.११.२०२१ | २४.११.२०२१ |

अपिलार्थी यांनी दि. १४.१२.२०२१ रोजीच्या अर्जान्वये *" दिलेली माहिती व प्रथम अपिल आदेश असमाधानकारक आहेत. "*असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ०८.०४.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तसेच जन माहिती अधिकारी श्री.संजय पवार, कनिष्ठ अभियंता, नगररचना विभाग, उल्हासनगर महानगरपालिका उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीत येणारे क्षेत्र व परिक्षेत्रात शासकिय प्रशासकिय व महानगरपालिका यांचे साठी आरक्षित ठेवलेल्या भूखंडावरील झालेली अवैध अनधिकृत बांधकामाची संपूर्ण सविस्तर लेखी स्वरुपात माहिती द्यावी. "*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये *" माहिती प्राप्त झालेली नाही "*असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.०८.१०.२०२१ रोजीच्या पत्रान्वये पुढीलप्रमाणे उत्तर दिलेले आहे.

*"उल्हासनगर शहराच्या विकास आराखड्यामध्ये आरक्षित असलेल्या भुखंडाची नोंदी असलेल्या पुस्ताकाची ६८ पृष्ठे आहेत त्याची १० रु प्रतीपान प्रमाणे ६८० रु.शासकिय शुल्क भरुन उपलब्ध करुन घ्यावी. तसेच आरक्षित भुखंडावरील अतिक्रमणाबाबतची माहिती या कार्यालयाच्या अभिलेखात उपलब्ध नसल्यामुळे ती आपणास देता येत नाही."*

अपिलार्थींनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन, दि.२४.११.२०२१ रोजी पुढीलप्रमाणे आदेश पारित केलेले आहेत.

*"जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता यांनी अर्जदारास माहिती दिलेली आहे. तसेच माहिती अधिकारात मोघम माहिती देता येत नाही."*

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागीतलेली माहिती त्यांना अपूर्ण पुरविण्यात आलेली असल्याचे सुनावणी दरम्यान सांगितले. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी हे अनुपस्थित असल्यामुळे, त्यांचे कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहिती बाबत त्यांचे प्रतिनिधी सुनावणी दरम्यान सांगू शकले नाहीत. या कारणामुळे सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. पुढील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची उपस्थिती अनिवार्य राहिल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि.१०.०६.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०८ एप्रिल, २०२४ .

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ